JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# आचार्य विनोबा भावे यांचे सर्वोदयासंबंधी तत्वज्ञान :

**प्रा.डॉ.उमाकांत ज्ञानोबा वानखेडे**

**राज्यषास्त्र विभाग प्रमूख**

**नवगण षिक्षण संस्थेचे कला**

**व वाणिज्य महाविद्यालय**

**परळी वै. जि. बीड**

## प्रस्तावना :

विनोबा भावे भूदान अंदोलनाचे प्रणेते व सर्वोदय चळवळीचे अग्रदुत होते. महात्मा गांधी यांनी पहिले वयैक्तिक सत्यागृही म्हणून त्यांची निवड केली होती. गांधी तत्वज्ञानाच्या स्वातंoयोत्तर काळात विकास करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आपल्या पवनार येथील परंधाम आश्रमात गांधीच्या सोबत आणि गांधीच्या अस्तानंतरही अनेक विधायक कार्याचे आयूश्यभर प्रयोग करत राहिले. जमीनीचे असमान वितरण हे ग्रामीण भागातील दारिद्रयाचे प्रमूख कारण होते. ग्रामिण भागातील दारिद्रय दूर करण्यासाठी भूदान यज्ञाला प्रारंभ केला. सूरुवातीला तेलंगणा प्रांतात सुरु केलेली चळवळ देषभर राबविली. या चळवळीच्या माध्यमातून अनेक भुमिहिनांना जमीन मिळवून दिली भूदानाला संपत्तीदान श्रमदान आणि जीवनदानाची जोड दिली. भूदान चळवळीच्या माध्यमातून अहिंसात्मक क्रांती घडवून काळानुरुप संषोधन करण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. सर्वोदयी विचारांची पायाभरणी गांधीनी केली तर त्या पायावर इमारत उभी करण्याचा प्रयत्न विनोबांनी केला असे म्हटले जाते.[1]

## आचार्य विनोबा भावे यांचा जीवन परिचय :–

आचार्य विनोबा भावे यांचा जन्म 11 सप्टेंबर 1895 रोजी सातारा जिल्हयातील गागोद या गावी झाला. कर्तृत्ववान सुधारक ब्राम्हण कुंटूबात जन्मलेल्या विनोबांचे आजोबा षंभुराव हे त्यांचे वाई येथील वडिलपार्जित षंकराचे मंदिर उत्सवात हरिजनासाठी खुले ठेवीत. त्या काळात त्यांची ही कृती धरिश्टयाची होती देवा समोर होणाऱ्या भजनांसाठी कधी कध ते मुसलमान गायकाला बोलावणे करीत. त्यामुळे त्यांच्यावर टिका होत असे लोकांच्या नाराजीकडे त्यांनी दुर्लक्ष केले. सामाजिक सुधारणेचे आणि धार्मिक सहिश्णूतेचे धडे विनोबांनी अजोबांकडून घेतले. आजोबांचा त्यांच्यावर प्रभाव होता षंभुरावांच्या उदार दृश्टीकोनामुळे तसेच दानषुरपणामुळे पंचक्रोषीत त्यांना आदर होता. अंबा उतरवल्यावर ते आंबे इतराना वाटप करीत व मग घरात देत असत ते चांगले वैदय हाते. नाडी परिक्षा अचूक करुन औशधे ही देत तेही मोफत. विनोबांच्या अजीचे नाव गंगाबाई होते वयाच्या 55 वर्शी त्या लिहणे वाचणे

षिकल्या. पतीच्या निधनानंतर कुंटूबाचा धिराने त्यांनी सांभाळ केला. विनोबाचे वडील नरहरीराव हे पापभिरु पण षिस्तीचे गृहस्थ होते. त्यांच्या वर्तनातही पध्दतषीरपणा होता. पाष्चात्य षिक्षण, विज्ञानाचे ते भोक्ते होते. बडोदयाच्या कलाभवनातून त्यांनी पदविका प्राप्त केली होती. एक मिलमध्ये रंग विभागात त्यांनी कांही काळ काम केले. कापड प्रथम उत्पादन करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते.[2]

## सर्वोदय चळवळ :–

गांधीच्या विचारांची मूळ प्रेरणा अध्यात्मवाद आहे. सर्वोदय विचारधारा त्याला अपवाद नाही. सर्वोदय विचारधारेवर गांधीच्या आध्यात्मीक विचारांचा व्यापक प्रभाव पडलेला आहे. गांधीनी सर्वोदयाचा तात्विक आधार आपली आध्यात्मिक आस्था आसल्याचे जाहिरपणे नमूद केलेले आहे. ते म्हणतात की, "सर्वोदयाचे सामान्य आणि षाष्वत रुप निर्विवाद स्वरुपात अव्दैत आणि अध्यात्मवादाचा स्वीकार करते. सृश्टीच्या अंतर्गत असलेल्या षाष्वत नैतिक व्यवस्थेप्रति सर्वोदय अंखड विष्वास प्रकट करतो." सर्वोदय हे वस्तूतः गांधी तत्वज्ञानाचे व्यावहारिक रुपांतर किंवा स्वांत०योतर अविश्कार मानला जातो. सर्वोदयाच्या माध्यमातून सर्वांचे कल्याण एक साथ करण्याचा निर्देष व्यक्त केला जातो. सर्वेचे कल्याण व उदयाचा विकास करण्याचा सर्वोदयी राजकीय तत्वज्ञानाच्या आग्रह एक विलक्षण प्रयोग मानला जातो. जगातील कोणत्याही विचारधारा वा तत्वप्रणाली मानवी हिताच्या एकरुपतेची वा सर्व मानवाच्या एक साथ विकासाची कल्पना मांडत नाही. राजकीय चिंतन करणाऱ्या विविध विचारधारा विषिश्ट वर्ग हिताच्या विकासाची कल्पना मांडतात. उदा : मार्क्सवाद कामगार वर्ग, सर्वोदय विचार सरणी एका विषिश्ट वर्ग,गट वा समूदायाच्या विकासाचा विचार मांडत नाही. तर संपूर्ण मानव जातीला केंद्रबिंदू मानून विचार प्रस्तूत करते हा वेगळेपणा सर्वोदयाला एक वेगळया उंचीवर घेउन जातो.[3] सर्वोदय चिंतनाच्या माध्यमातून मानवी हितात एकरुपता आणि विलक्षण स्वरुपाचे अव्दैत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो.

## सर्वोदया अर्थ आणि पार्श्वभूमी :–

सर्वोदय गांधीवादी दर्षनाचे मर्म आहे. सर्वोदय हा षब्द सर्व + उदय = सर्वोदय असा बनलेला आहे. सर्वोदय षब्दाचा अर्थ 'सर्वांचा उदय वा समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास होय. सर्वोदय संकल्पनेत समाजातील सर्व घटकांच्या विकासाचा विचार सम्मिलीत आहे. जगातील सर्व विचारधारा पैक्षा सर्वोदय विचारधारा ही व्यापक स्वरुपाची आहे. सर्वोदय विचार आधुनिक संदर्भ प्राप्त करुन देण्यासाठी गांधी सांगतात की "सर्वोदय षब्दाचा सारांषमध्ये अर्थ असा आहे की सर्व जिवनातील क्षे०ाच्या पाप्तींना एक साथ सुनिष्चित करणे आहे." मानवी जीवनातील सर्व क्षेत्रात मानवी प्रगतीची घोड दौड सारख्या पध्दतीने झाली पाहिजे आणि त्या सर्व मानवांना विकासाची एक सारखी संधी मिळाली पाहिजे. अषा प्रकारची व्यवस्था निर्माण करणे हा सर्वोदयाचा उदेष आहे. जॉन रस्कीन च्या 'Un to the last' ग्रंथाच्या प्रभावातून गांधीनी सर्वोदयाची कल्पना मांडलेली आहे.[4] या पुस्तकात येषू ख्रिस्त प्रवचन संपल्यानंतर प्रसाद देताना अनुयायांना म्हणतो की हा षेवटच्या माणसापर्यंत पोहोचवा रस्कीन या अध्यात्मीक प्रसंगाचा अर्थ सामाजिक संदर्भात लावतो. मानवी जीवनातील प्रगतीपासून कोणतीही व्यक्ती वंचित राहता कामा नये. गांधीनी रस्कीनच्या पुस्तकाचे गुजरात भाशांतर केले. या पुस्तकाच्या षिर्शकाचे षब्दषः भाशांतर 'अंत्योदय' असे होते. परंतू

गांधीनी षब्दषः अर्थ न स्विकारता 'सर्वोदय' हा नवा विचार वा षब्द प्रस्तूत केला. या नव विचाराच्या माध्यमातून गांधी एक अदभूत राजकीय संकल्पनेची मांडणी करुन आधूनिक भारताच्या उभारणीसाठी नाविन्यपूर्ण तत्वदर्षन करत होते.

## सर्वोदय विचारधारा आणि साम्यवाद :–

सर्वोदय व साम्यवाद या दोन्ही विचारसरणीमध्ये एक समन्वयकारी स्वरुपाची तत्वे आढळून येतात. या दोन्ही विचारधारा दंडषक्तीवर आधरलेल्या राज्य संस्थेला नश्ट करण्याची भाशा करतात या दोन्ही विचारधारेची व्याप्ती विषिश्ट राश्ट्रांपूरती नसून विष्वव्यापक आहे. आर्थिक क्षमता आणि सामाजिक सुरक्षिततेवर आधारलेल्या समाजरचनेची स्थापना करण्याचा प्रयत्न करतात. जमिनी फेरवाटणी,भूमीहीनांचे कल्याण अमुलाग्र सामाजीक क्रांती घडवून आणण्याषिवाय षक्य नाही. सर्वोदय व साम्यवाद षोशण आणि भांडवलषाहीचा विरोध करतात. या अर्थाने साम्यवाद व सर्वोदय विचारसरणीत अनेक साम्यस्थळे दर्षविता येतात. दोन्ही विचारसरणीतील अनेक तत्वांमध्ये साम्यता अढळून येतात. या दोन्ही विचारधारेतील फरक पुढील मूदयांच्या आधारे करता येइल.

1) गांधी म्हणतात की, "मार्क्स आणि लेनिनव्दारा निर्मित साम्यवादाला एक अस्थायी भुमित करणारा आणि प्रतिक्रियावादी दर्षन म्हणतात." हाच गांधी विचारांचा धागा पकडून विनोबा साम्यवादाला विरोध करतात. साम्यवादाला पर्याय म्हणून सामाजिक आणि आर्थिक अन्याय नश्ट करण्यासाठी पर्याय म्हणून सामाजिक आणि आर्थिक अन्याय नश्ट करण्यासाठी गांधीप्रणीत सर्वोदय दर्षनाचा विस्तार करुन साम्यवादाला विरोधक करतात. साम्यवादात फक्त कामगारांच्या हिताचा विचार केला जातो. पण सर्वोदय हि विचारधारा संपूर्ण समाजाच्या हिताचा विचार करते. त्यामुळे सर्वोदय दर्षन ही एक देषापुरते मर्यादित विचारधारा नसून विष्वव्यापक विचारधारा आहे. पृथ्वीवरील सर्व साधनसंपत्तीवर समाजाची मालकी असल्यामुळे तिचा उपयोग घेण्याचा अधिकार विषिश्ट व्यक्ती वा गटाचा नसून संपूर्ण मानवजातीचा आहे अषी सर्वोदयाची प्रमूख धारणा आहे."[5]

2) सर्वोदय आणि साम्यवादातील फरक स्पश्ट करताना भा.ल. भोळे लिहतात की,"साम्यवाद आत्म्याच्या अभिन्नत्वावर विष्वास ठेवत नाही. परंतू सर्वोदयाचा त्यावर विष्वास आहे. सर्वोदय केवळ आत्म्याच्या अभिन्नत्वावर विष्वास ठेवून थांबत नाही. तो या श्रध्देच्या पायावर आणखी पूढे पाउल टाकतो आणि त्या योगाने नैतिक,आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात क्रांतीकारक बदल घडवून आणतो.

3) सर्वोदय विचारधारा वर्णव्यवस्थेचे समर्थन करुन परंपरागत व्यवसाय करावे यावर भर देतात. साम्यवाद वर्ग नश्ट करण्याची भाशा करतात. वर्गाचा अंत केल्याषिवाय समता प्रस्थापीत होणे षक्य नाही. वर्गविरहीत समाज निर्माण करण्याचे स्वप्न पाहतात.

4) साम्यवाद भौतिकतेवर भर देणारी जडवादी विचारधारा आहे. ते धर्माला अफूची गोळी मानतात. तर सर्वोदय ही आध्यात्मीकता व नैतिकतेवर भर देणारी विचारसरणी आहे. साम्यवादी भांडवलषाही नश्ट करुन संपत्तीच्या

सामाजिकीकरणावर भर देतात. तर सर्वोदयी भांडवलदारांमध्ये विष्वास संकल्पनेच्या माध्यमातून त्याग व समाजसेवा वृत्ती निर्माण करण्यावर भर देतात.

5) गांधी ग्रामोदयोग व कुटीरउदयोंगावर भर देतात. साम्यवाद व्यवस्था अवजड व मोठया उदयोग आणि यांत्रिकीकरणावर भर देणारी विचारधारा आहे. सर्वोदयात अंहिसात्मक राज्याची संकल्पना असून राज्याच्या केंद्रिकरणाला विरोध करतात. राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात विकेंद्रिकरण महत्वाचे मानतात. तर साम्यावाद सत्तेच्या केंद्रिकरणाबरोबर आर्थिक उत्पादनाच्या साधनावर राज्याची मालकी प्रस्थापित करुन आर्थिक केंद्रिकरणाला प्राधन्य देतात.

6) नव्यासमाज रचनेच्या स्थापनेसाठी सर्वोदयी अंहिसात्मक मार्गाचा अवलंब करतात. साम्यवादी वर्ग नश्ट करण्यासाठी हिंसेचा आश्रय घेणे आवष्यक मानतात. क्रांती,हिंसा,जबरदस्ती,दडपषाही,रक्तपात इत्यादी कोणत्याही मार्गाने होणाऱ्या क्रांतीला मान्यता देतात. क्रांतीनंतर कामगारांची हुकूमषाही प्रस्थापीत करण्यावर भर देतात. साम्यवाद हा हिसेंवर भर देणारा विचार आहे. तर सर्वोदय हा प्रेम, अंहिसा,सेवा,त्याग इत्यादीवर भर देणारा विचार आहे.

7) साम्यवाद संघर्श,रक्तपात आणि हिंसेच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. सर्वोदय बाहयपरिवर्तनाला महत्व देत नाही. बाहय परिवर्तना सोबत अंतरिक परिवर्तनाला महत्व देतो. ते परिवर्तन षांती,प्रेम,अंहिसा,सहकार्य इत्यादी मार्गाने घडू षकते. हिंसेचा आधार घेउन वा कायदे करुन जमीनी पूनर्वितरणाचा प्रष्न सोडवता येईल पण जमीनीची लालसा नश्ट करता येणार नाही.

8) विनोबा भावे सांगतात की, "सर्वोदय व साम्यवाद यात भेद केवळ साधनांपुरता मर्यादित नसून दोन्हीमध्ये तात्वीक स्वरुपाचे तिव्र भेद आहेत." साम्यवाद हा अर्थकारणाषी जोडलेला आणि त्यांचा केंद्रित पध्दतीने विचार करणारा विचार आहे. तर गांधीवाद समाजाच्या सर्वांगीण विकासावर भर देणारा, आध्यात्मिक आणि नैतिक स्वरुपाचा विचार आहे.

9) साम्यवाद विचारधारा सत्तेच्या केंद्रिकरणावर भर देणारी विचारधारा आहे. साम्यवादी व्यवस्थेत क्रांतीनंतर कामगारांच्या हुकूमषाहीकडे सत्तेची सुत्रे सोपविली जातील. कामगारांच्या हुकूमषाहीनंतर राज्य नश्ट होईल. याची षाष्वती विनोबांना वाटत नव्हती. कामगारांच्या हुकूमषाहीच्या काळात सत्तेचे केंद्रिकरण होउन राज्याकडे असलेल्या सत्तेत अधिक वाढ होईल. सर्वोदय ही विचारधाराा सत्तेच्या विकेंद्रिकरणाला महत्व देते. सत्तेचे योग्य पध्दतीने विकेंद्रिकरण करण्यासाठी ग्रामराज्याच्या संकल्पनेला महत्व देतात.

10) सर्वोदय विचारधारेत सुड,कटूता व संघर्शाला थारा नाही. सर्वोदयाच्या स्थापनेत सर्व वर्गाचे सहकार्य अपेक्षित आहे. वरिश्ठ वर्गामध्ये विष्वस्त वृत्ती निर्माण करण्यावर भर आहे. ग्रामराज्य संकल्पनेत मालकी हक्कांचे विसर्जन लोक स्वइच्छने करतील. त्यामुळे सामाजिक तणाव,संघर्श आणि षोशणाची जागा,स्वातंत्र,परस्पर सदिच्छा व सहकार्य घेईल. साम्यावादी विचारसरणी फक्त कामगार वर्गाचा विचार केला जातो. कामगारांच्या हितासाठी भांडवलदार आणि

मालक वर्ग नश्ट करण्याची भाशा केली जाते. साम्यवाद व्देश,कटूता,संघर्श आणि सक्तीवर भर देणारी विचारसरणी आहे.?

**समारोप :–**

सर्वोदय विचारसरणी मानवी मूल्यांना महत्व देणारी आदर्षवादी विचारप्रणाली आहे. सर्वोदयाच्या माध्यमातून व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाच्या सर्वोगीण विकासावर भर दिला जातो. व्यक्ती हा सर्वोदयाचा प्रमूख केंद्रबिंदू आहे. समाजहितात व्यक्तीहित समाविश्ट आहे हा विचार प्रभावीपणे मांडण्याचे कार्य चळवळीने केले. व्यक्ती ही इष्वराची निर्मितीत आहे. व्यक्तीत इष्वरी गुणांचा अंष आहे या इष्वरी गुणांना प्रोत्साहन दिल्यास आदर्ष समाजाची निर्मिती करणे अषक्य नाही. हा विचार रुजविण्याचे श्रेय सर्वोदय चळवळीला दिले पाहिजे. ही चळवळ मानवी मनाला विषाल बनविण्यासाठी साद देते. वर्गसंघर्शाच्या मार्क्सवादी तत्वज्ञानाला नाकारुन सत्य आणि अंहिसेच्या आधारावर नवसमाज उभारणीचा प्रयत्न करते. खाजगी मालमत्तेचा प्रष्न हिंसात्मक मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न न करता अहिंसात्मक मार्गाने हा प्रष्न सोडविण्याचा प्रयत्न करते. सर्वोदय ही भांडवलदार व जमीनदारांच्या आध्यत्मिक कल्याणावर आणि श्रमिकांच्या भौतिक कल्याणावर भर देते. साम्यावादासारखे एक वर्गाच्या हिताची गोश्ट करत नाही. तर सर्व वर्गाच्या हिताची गोश्ट करते.

**संदर्भ सूची :**


1) महेंद्र पाटील भारतीय राजकीय विचारवंत विद्या बुक्स पब्लिषर्स औरंगाबाद 2019 पृश्ठ 3406

2) डॉ. रमेष ढोबळे, आधूनिक भारतीय राजकीय विचारवंत विद्या बूक्स पब्लिषर्स औरंगाबाद 2010 पृश्ठ 257

3) महेंद्र पाटील भारतीय राजकीय विचारवंत विद्या बुक्स पब्लिषर्स औरंगाबाद 2019 पृश्ठ 408

4) बा. न. राजहंस, लोकनायक जयप्रकाष 1985 पृश्ठ 95

5) महेंद्र पाटील भारतीय राजकीय विचारवंत विद्या बूक्स पब्लिषर्स औरंगाबाद 2019 पृश्ठ 420